# अभ्यंकर मंडळाची घटना

मंडळाचे नाव : **अभ्यंकर मंडळ**

नोंदणी क्र. : महा/२११२८/१३/ठाणे, दिनांक १२/१२/२०१३

अभ्यंकर मंडळाचा पत्ता : द्वारा श्रीमती रेखा सुधाकर अभ्यंकर,
ओम गुरुकृपा सहकारी गृहनिर्माण संस्था
०३, आदर्श निवास केन्द्र,
राम मराठे बंगल्या जवळ,
ठाणे-४००६०३

**मंडळाचे ध्येय व उद्दीष्ट:**

- अभ्यंकर कुळातील सभासदांमध्ये परस्पर सहकार्याची भावना जोपासणे, त्यासाठी सम्मेलने, चर्चासत्र, परिसंवाद, विभागीय मेळावे, शिबिरें, सहली, धार्मिक कार्यक्रम व सत्कार समारंभ तसेच इतर कार्यक्रम आयोजित करणे.

- अभ्यंकर कुलवृतांत अद्यावत ठेवण्यासाठी माहिती गोळा करणे, जतन करणे व वेळोवेळी पुरवणी स्वरुपांत सभासदांमध्ये वितरीत करणे. कुलवृतांताचे पुनर्रचना व पुनर्मुद्रण करणे.

- आर्थिक दृष्ट्या गरजू व निराधार अभ्यंकर परिवाराच्या सभासदांना व त्यांच्या माहेरवाशिणींना तसेच चित्तपावन ब्राम्हण व्यक्तींना शक्य तेवढी आर्थिक व वैद्यकीय मदत करणे.

- अभ्यंकर कुळातील विशिष्ठ कुळाचार-चालीरिती या विषयी संशोधन करणे, माहिती गोळा करणे, माहिती मिळविणे, ती संकलीत करणे,जतन करणे, व अशा कार्यास सहाय्य करणे.

- अभ्यंकर परिवाराच्या गरजू व होतकरु विद्यार्थी -विद्यार्थीनींना परतफेडीची शिष्यवृत्ती, निरपेक्ष शिष्यवृत्ती, पारितोषिक, प्रोत्साहन, पुरस्कार इत्यदि प्रकारे मदत करणे. तसेच त्यांना आर्थिक सहाय्य, तांत्रिक व व्यवसायिक मार्गदर्शन व शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देणे आणि त्या अनुषंगाने योग्य ते उपक्रम सुरुकरणे.

- अभ्यंकर परिवारातील निरनिराळ्या क्षेत्रांत प्राविण्य मिळविणारे, प्रसिद्ध असलेले-कलावंत, साहित्यिक, खेळाडू, उद्यमवीर वगैरेंचा गौरव करणे, तसेच ज्येष्ठ, श्रेष्ठ वृद्ध बंधुभगिनींचा सत्कार करणे.

- विद्या मंदिरे, वसतिगृहे, वृद्धाश्रम, दवाखाने, लधुउद्योग, व्यवसाय इत्यादींची योजना करणे, व्यवस्थापन सांभाळणे, स्वतः चालविणे अथवा चालविण्यास देणे. अभ्यंकर मंडळातील सभासदांकरिता वधु-वर सूचक मंडळ चालविणे व मेळावे घेणे.

| | | |
|---|---|---|
| आर्थिक हिशोबाचे वर्ष | : | वर्ष १ एप्रिल ते ३१ मार्च पर्यंत असे राहील |
| सभासद व त्याची -नोंदणी पद्धत | : | अभ्यंकर कुळातील वाशिष्ठ गोत्रोत्पन्न इंद्रप्रमदा, भरदसु त्रिप्रवरी चित्पावन यांत अभ्यंकर कुलोत्पन्न १८ वर्षवरील मुले, मुली माहेरवाशिणी व सुना तसेच पूर्वीचे अभ्यंकर पण नंतर इतर आडनाव घेतलेले नगरकर, महाबळ, मधुमते, कार्लेकर,पेठे व नातू अशांना सभासद होता येईल. त्या करिता सचिवांकडे विहीत नमुन्यात लेखी अर्ज करावा लागेल. अशा अर्जाची छाननी कार्यकारी मंडळ करील. कार्यकारीणी नियमावलीस अधीन राहून सभासदत्वासाठी आलेला अर्ज स्विकारण्याचा अथवा फेटाळण्याचा अधिकार असेल. |
| सभासदांचे प्रकार | : | अभ्यंकर परिवारातील तसेच पूर्वीचे अभ्यंकर पण नंतर इतर आडनाव घेतलेले नगरकर, महाबळ, मधुमते, कार्लेकर, बंधु भगिनी व माहेरवाशिंणींनी एक रकमी रोख किंवा धनादेशाद्वारे रुपये २५०/- (दोनशे पन्नास रुपये) भरुन साधारण सभासद होता येईल. |
| देणगीदार सभासद | : | जे सभासद संस्थेला देणगी स्वरुपात रुपये १०००/- (एक हजार रुपये) किंवा त्यापेक्षा जास्त देणगी देतील त्यांना देणगीदार सभासद म्हणून स्विकारण्यात येईल. |

-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-o-